# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ / चैत्र ४, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **कृषी मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### सोलापूर जिल्ह्यात बेकायदेशीरपणे गौण खनिजाचे उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१) * ५७९७५ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे उत्खनन सुरू असून शेळगी परिसरातील एका खडी क्रशरवर महसूल प्रशासनाने कारवाई केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात विविध ठिकाणी गौण खनिजाचे उत्खनन आणि वाहतूक होत असताना जिल्हा व तालुका प्रशासनाकडून करण्यात येणारी कारवाई परिणामकारक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात ८० खडी क्रशर सुरू असून खडी क्रशर संघटनांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन खडी क्रशरची रॉयल्टी भरून घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरण समितीची मान्यता घेऊन रितसर प्रस्ताव दाखल करून प्रस्तावास परवानगी मिळेपर्यंत खडी क्रशर बंद करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे शेळगी, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील खडी क्रशर धारक यांच्याकडे अवैध गौण खनिज आढळून आल्याप्रकरणी पाच खडी क्रशर माहे जानेवारी, २०२३ मध्ये सील बंद करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी पथके नेमण्यात आलेली असून, सदर पथकाने कारवाई दरम्यान माहे एप्रिल, २०२२ ते माहे जानेवारी, २०२३ या दरम्यान एकून ६६२ प्रकरणात कारवाई करण्यात

येऊन ०१.१३ कोटी दंडात्मक रक्कम वसुल करून शासन जमा करण्यात आलेली आहे.

पंढरपूर तालुका खडी क्रशर संघटना, पंढरपूर यांनी दिनांक २५.१२.२०२२ रोजीच्या खडी क्रशरची रॉयल्टी भरून घेण्यात यावी याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागणी केली आहे

सबब, प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय अवैध पणे दगड उत्खनन करून क्रशर चालविण्यात येत आहेत अशा खडी क्रशवर कारवाई करून बंद करण्यात आले आहेत.

-----------------

## नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संरक्षण अकादमी स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत

**(२) * ६०७९६ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुलींना राष्ट्रीय संरक्षण अकादमीसारख्या संस्थेत थेट जाऊन प्रशिक्षण देण्याकरिता मुलींची एनडीए अकादमी सुरु करण्यात येणार असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संरक्षण अकादमी स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अकादमीत मुलींना एनडीए व स्पर्धा पूर्वपरिक्षा निवासी प्रशिक्षण देण्यात येणार असून यासाठी लागणारी इमारत तसेच अद्ययावत स्वरुपाची सर्व साधनसामुग्रीची उपलब्धतता महाज्योतीच्यावतीने करण्यात येणार असून त्यासाठी रुपये ५० कोटी रुपयांचा निधी देखील देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाज्योती संस्थेकडून यासंदर्भात पुढील कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे अनेक मुली या प्रशिक्षणापासून अद्यापही वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिनांक ७.३.२०२२ अन्वये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव मौजा नायगाव, ता.खंडाळा, जि.सातारा येथे महाज्योती संस्थेमार्फत मुलींकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास रुपये २४.०० कोटी इतका निधी महाज्योती संस्थेस उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यात असून जागा हस्तांतरणाची कार्यवाही चालू आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा बँकेच्या कर्ज वाटपात अनियमितता व नोकर भरतीत झालेल्या गैरकारभाराबाबत

**(३) * ५६५४४ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा बँकेच्या कर्ज वाटपातील अनियमितता, नोकर भरती व कामकाजातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतचे आदेश शासनाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.
(२) सद्य:स्थितीत चौकशीचे कामकाज सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील मुंबई-वडोदरा महामार्गासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(४) * ५९६२१ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील मुंबई-वडोदरा महामार्गासाठी भूसंपादन करताना ज्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्या त्यांना महामार्ग प्राधिकरणाकडून अद्याप नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही प्रकरणांमध्ये जागेचा मोबदला शेतकऱ्यांऐवजी अन्य एका कंपनीस अदा केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील सर्व्हे नं.२०२ पैकी २०२/१३ संपादित जमिनीचा मोबदला वसुली करून आदिवासी खातेदारांना मिळण्याबाबतचा अहवाल तहसीलदार तलासरी यांनी सक्षम प्राधिकारी (एक्स्प्रेस वे) तथा उप विभागीय अधिकारी, डहाणू विभाग यांना दिनांक ०२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा.लि. कडून आदिवासी शेतकऱ्यांची जाणीवपूर्वक फसवणूक होत असतानाही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने सामान्य आदिवासी शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबई वडोदरा एक्स्प्रेसवेसाठी केलेल्या भूसंपादनाची नुकसान भरपाई आदिवासींना मिळवून देण्याबाबतचे आश्वासन तत्कालीन महसूल मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले होते तसेच त्याबाबत तत्कालीन महसूल मंत्री यांनी नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश देऊनही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) मौजे-तलासरी, ता.तलासरी येथील सर्व्हे नंबर २०२/१३ संपादित होत नसल्याने सदर सर्व्हे नंबरचा निवाडा झालेला नाही. परंतु, खातेदारांच्या मागणीनुसार तहसिलदार डहाणू यांनी सर्व्हे नंबर २०२/१३ ची पोटहिस्सा होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी डहाणू यांनी उपअधिक्षक भुमी अभिलेख, तलासरी यांना पोटहिस्सा मोजणी करण्याचे कळविले असून त्याप्रमाणे सर्व्हे नंबर २०२/१३ ची मोजणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

(४), (५) व (६) सर्व्हे नंबर २०२/१० नविन सर्व्हे नं. २७५/५ मध्ये खातेदार विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. याचे जागेत एकुण ८ बांधकाम (घरे) आदिवासी शेतकऱ्याची संपादनाखाली आली असून त्या घरांचा एकुण मोबदला रुपये १,१९,१३,९४०/- चा निवाडा घोषित करण्यात आला आहे. सदर बांधकामाचा मोबदला वाटप करताना खातेदार व बांधकामधारकांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार एकुण ८ खातेदार व बांधकामधारकांना बांधकामाचा मोबदला रक्कम रुपये ४३,५६,६०३/- एवढा अदा करण्यात आला आहे व उर्वरीत मोबदला रक्कम रुपये ७५,५७,३३७/- विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. यांना अदा करण्यात आला आहे. मौजे-तलासरी, येथील सर्व्हे नंबर २०२/१३ बाबत लोकप्रतिनीधींनी दिनांक २५.०५.२०२२ रोजी मा. मंत्री (महसूल) यांना तसेच उपविभागीय अधिकारी, डहाणू यांना निवेदन दिले आहे.

सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने, विद्यावासिनी कॉर्पोरेशन प्रा. लि. यांना जादा अदा करण्यात आलेला मोबदला वसुल करणेसाठी त्यांच्या नावे असलेल्या स्थावर मालमत्तेची जाहिर लिलाव विक्री करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. कार्यवाही पूर्ण होताच संबधित शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नागपूर येथील दुय्यम निबंधक आणि प्रभारी दुय्यम निबंधक यांनी पदाचा दुरुपयोग करुन केलेला गैरव्यवहार

**(५) * ६०९०३ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात पूर्णतः ग्रामीण भागातील कृषक/अतिक्रमित जागा विक्रीस शासनाची परवानगी नसलेल्या व अन्य कोणत्याही जागेची खरेदी विक्री करण्यास बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुय्यम निबंधक क्रमांक ७, नागपूर शहर तसेच प्रभारी दुय्यक निबंधक क्रमांक १०, नागपूर यांनी पदाचा दुरुपयोग करुन कृषक तथा जमिनीची अवैधरित्या खरेदी विक्री दस्तांची नोंदणी करुन अब्जावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांना निलंबित करुन चौकशी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी तसेच दुय्यम निबंधक वर्ग-२ नागपूर ग्रामीण यांचेकडे अनुक्रमे माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दुय्यम निबंधक क्रमांक ७ यांनी एकाच दिवशी १५० पेक्षा जास्त दस्तांच्या नोंदणीचा विक्रम माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

श्री.विकास कुंभारे,विधानसभा सदस्य यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नागपूर शहर क्रमांक ७ कार्यालयात दस्त नोंदणी संदर्भात अनियमितता झाली असल्याबाबत व त्याबाबत कठोर कार्यवाही करण्याबाबतचे पत्र सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नागपूर शहर यांच्या कार्यालयात दिनांक १४.११.२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे.

(३) हे खरे नाही.

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नागपूर शहर क्रमांक ७ यांनी माहे मार्च, २०२२ मध्ये एकाच दिवशी जास्तीत जास्त ७५ इतक्या दस्तांची नोंदणी केलेली आहे.

(४) सदर प्रकरणी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नागपूर शहर क्रमांक ७ या कार्यालयाची चौकशी करुन अहवाल नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर विभाग, नागपूर यांना सादर केलेला आहे.

तथापि, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर विभाग यांचे पत्र दिनांक २०.२.२०२३ अन्वये दस्तातील अनियमितता बाबत दस्त निहाय स्वतंत्र अहवाल सादर करण्याकरिता सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर यांना निर्देश दिले असून याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी (जि.चंद्रपूर) व्याघ्र प्रकल्पातील टी-६ या नरभक्षक वाघिणीला जेरबंद करण्यास होत असलेला विलंब

**(६) * ५६८६८ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी (जि.चंद्रपूर) व्याघ्र प्रकल्पातील टी-६ या नरभक्षक वाघिणीला पकडण्यासाठी अनेक संस्थांच्या माध्यमातून वन विभागाला विनंती करुनही विभागाने केलेल्या दुर्लक्षामुळे अनेक लोकांचे बळी गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील दिभना, जेप्रा, राजगाटा, कळमटोला, धुंडेशिवणी व चुरचुरा या जंगल परिसरात गत सात महिन्यापासून ते आतापर्यंत १० लोकांचे टी-६ या वाघिणीने बळी घेतल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या जंगलात दोनशेपेक्षा अधिक वाघांचा वावर असून मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्याकरीता वन विभागाकडे अद्यापही कुशल मनुष्यबळ व अत्याधुनिक साहित्याचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वाघिणीच्या ४ पिल्लांपैकी २ पिल्लांचा अमिर्झा बिटात मृत्यू होणे तसेच पोर्ला व चातगाव वनपरिक्षेत्रातील सिमावर्ती भागात अन्य वाघांच्या हल्ल्यात २ पिल्लांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील वडसा वन विभाग व गडचिरोलीच्या लगतच्या क्षेत्रामध्ये टी-६ या वाघिणीला जेरबंद करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- संवेदनशिल क्षेत्रात गस्तीपथकाद्वारे नियमित गस्त करणे.
- ग्रामस्तरावर प्राथमिक बचाव दलाची स्थापना करुन स्थानिकांमध्ये मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात येते.

• टी-६ या वाघिणीस जेरबंद करण्यासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत असलेल्या शिर्घ कृति दलाची मदत घेण्यात आली.

(२) दिनांक २६.०७.२०२२ ते दिनांक २६.१२.२०२२ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात T-६ या वाघिणीच्या हल्ल्यात १० व्यक्तींचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सद्यस्थितीत चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये अंदाजे २१७ वाघ आहेत.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर येथे मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी प्रशिक्षित बचाव दल, कॅमेरा ट्रॅप्स, ट्रोन, ट्रॅन्क्युलायझर गन व औषधी इत्यादी साहित्य उपलब्ध आहे.

मानवी जिवितास हानी पोहचविणाऱ्या वन्यप्राण्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीचा अवलंब करुन जेरबंद करण्याकरीता ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील जलद बचाव दलासोबत आवश्यकतेनुसार इतर व्याघ्र प्रकल्पातील जलद बचाव दलाची मदत देखील घेण्यात येते.

गडचिरोली जिल्ह्यातील मानव वन्यजीव संघर्ष रोखण्याकरीता जलद बचाव दल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) गडचिरोली वनविभागाअंतर्गत चातगाव परिक्षेत्रातील अमीर्झा नियतक्षेत्रात दिनांक ०३.०१.२०२३ रोजी १ व दिनांक ०६.०१.२०२३ रोजी १ असे एकूण २ वाघाचे बछडे (वय अंदाजे ३ महिने) मृत अवस्थेत आढळून आले आहेत. परिस्थीतीजन्य पुरावे व शवविच्छेदन अहवालानुसार सदर बछड्यांचा मृत्यु दुसऱ्या वाघाच्या हल्ल्यात झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, उक्त दोन्ही बछड्यांचा अवयावांचे नमुने पुढील तपासणीसाठी Center for Cellular and Molecular Biology (CCMB) Hyderabad या संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थेच्या थकीत कर्जाची वसूली कार्यक्षमतेने होण्याबाबत

**(७) * ५८००२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थेच्या थकीत कर्जाच्या वसूलीकरिता थकीत कर्जदारांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा ताबा बँकाना देण्याबाबत माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सहकार आयुक्तांनी सूचनावजा आदेश देवूनही जिल्हाधिकाऱ्यांनी त्या मालमत्ता बँकेकडे सुपूर्द केल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बँकाच्या थकित कर्जाची वसूली वेळेत करुन व अनुत्पादक कार्याचे प्रमाणात (N.P.A) कमी करण्याच्या सूचना सहकार विभागाकडून दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नागरी बँकांकडून थकीत कर्जाच्या वसूलीसाठी सरफेस कायद्यानुसार जप्त मालमत्तेचा ताबा मिळण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करुनही चार वर्षांपर्यंत ताबा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नागरी सहकारी बँका / पतसंस्थांच्या जप्त केलेल्या मालमत्तांचा ताबा मिळणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर जलदगतीने कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सहकार आयुक्तांच्या दिनांक २२/१२/२०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(३) व (४) नागरी सहकारी बँकांकडून बऱ्याचवेळा थकीत कर्जाची वसुली THE SARFAESI ACT, २००२ या कायद्यांतर्गत केली जाते. सदर कायद्याच्या कलम १४ नुसार जप्त केलेल्या मालमत्तांचा ताबा मिळणेसाठी देखील संबंधीत जिल्ह्याच्या मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करुन ताबा मिळविणेची तरतूद आहे. त्यानुषंगाने राज्यातील नागरी सहकारी बँका / पतसंस्थांच्या वसुली अधिकाऱ्यांकडून जप्त मालमत्तांचा ताबा मिळणेसाठी प्रस्ताव संबंधीत जिल्ह्याच्या मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांचे कडे सादर केले जातात. तथापि सदर कार्यालयांकडून मालमत्तेचा ताबा मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे मालमत्ता विक्री व तदनुषंगिक प्रक्रीया होण्यास खुप जास्त कालावधी खर्च होतो. यास्तव दर दोन महिन्यांनी संबंधीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था तसेच संबंधीत बँक फेडरेशन/असोसिएशन, पतसंस्था फेडरेशन/असोसिएशन यांचे पदाधिकारी यांची एकत्रित आढावा बैठक घेतल्यास सदर प्रकरणाची प्रलंबितता कमी होऊन जलद निपटारा होण्यास मदत होईल व सहकारी संस्थांची वसूली प्रभावी पद्धतीने होईल, यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सहकार आयुक्तांच्या दिनांक २२/१२/२०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द शिवाजीनगर (मुंबई) येथील महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रातील रिक्त भूखंडावर अवैध कब्जा केल्याबाबत

**(८) * ५६९११ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द शिवाजीनगर (मुंबई) येथील महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रातील शासनाच्या रिक्त भूखंडावर भूमाफियांनी अवैध कब्जा केला असून त्या जागेची बेकायदेशीर विक्री करून सामान्य गरीब जनतेला फसविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रफीक नगर नाला येथे मोठ्या प्रमाणात मातीची भरणी करून नाल्याची रुंदी कमी करण्यात येत आहे यामुळे नाल्याचे सांडपाणी जाण्यास मार्ग राहिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंडाळा, कलेक्टर चाळ येथील नाल्यावर मातीची भरणी करून त्यावर झोपड्या बांधून विक्री करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भूमाफियांवर कारवाई करण्याची मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात आलेली असतानाही त्यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मौजे-मानखुर्द येथील न.भू.क्र. १/२ पै. या शासनाच्या भूखंडावर अनधिकृत झोपड्या बनवल्या जात असून सदर झोपड्या भूमाफियांकडून विकल्या जात असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ३१/०१/२०२३ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) एम/ पूर्व विभागातील रफीक नगर येथील मोठ्या नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण व पुर्नबांधणीचे काम हे अहिल्याबाई होळकर मार्ग ते ठाणे खाडीच्या किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ- Coastal Regulation Zone) पर्यंत सन २०१८ मध्ये करण्यात आले आहे, सदर ठिकाणी बांधण्यात आलेल्या नाल्यामध्ये कोणत्याही प्रकारची मातीची भरणी केल्याचे आढळून आले नाही, तसेच एम/पूर्व विभागाच्या अखत्यारितील मानखुर्द, शिवाजीनगर येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रिक्त भूखंडावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात येते, असा अहवाल सहायक आयुक्त एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २१/०२/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर केला आहे.

(३), (४) व (५) महाराष्ट्र शासनाच्या भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन) यांच्यामार्फत करण्यात येते.

उप जिल्हाधिकारी (अति/ निष्का) चेंबूर यांनी मागील एका वर्षात मौजे- मानखुर्द, शिवाजी नगर येथील शासकीय जमिनीवरील एकूण २३२ अतिक्रमीत झोपड्या निष्कासित केलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवघर (ता.जि.पालघर) गावाजवळ मुरुम आणि मातीचे अवैध उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(९) * ५७२०६ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्गाच्या निर्मितीसाठी सफाळे रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील नवघर गावातील गट क्रमांक १८८ येथे मुरुम आणि मातीचे अनुज्ञेय मर्यादेबाहेर उत्खनन सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर ठिकाणी केवळ आठ हजार ब्रास मुरुम उत्खननाची परवानगी असताना आजतागायत दीड लाख ब्रासचे उत्खनन केल्यामुळे शासनाचा महसूल बुडाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही याचा पाहणी अहवाल न पाठविता यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध उत्खनन रोखण्याबाबत व दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मंडळ अधिकारी, सफाळे व तलाठी, करवाळे यांनी दिनांक ०७.१२.२०२२ रोजी केलेला स्थळपाहणी अहवाल तहसिलदार, पालघर यांना सादर केला असून त्यानुसार मौजे नवघर ता.जि.पालघर येथील स.नं./गट नं.१८८ एकूण ५७,५८८ ब्रास मुरुम-मातीचे उत्खनन केल्याचे आढळून आले.

त्यानुषंगाने तहसिलदार, पालघर यांचेकडून संबंधित कंपनीस दिनांक ०८.१२.२०२२ रोजी एकूण ५७,५८८ ब्रास अनधिकृत मुरुम-माती उत्खनन केल्याबाबत नोटीस देण्यात येवून दिनांक १९.१२.२०२२, दिनांक २९.१२.२०२२ व ०९.०१.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये संबंधीत कंपनीने सादर

केलेला खुलासा विचारात घेऊन तहसिलदार, पालघर यांनी संबंधित कंपनीस दिनांक ०८.१२.२०२२ रोजी दिलेली नोटीस दिनांक ०६.०२.२०२३ अन्वये मागे घेण्यात आली आहे.

-----------------

**माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यासह इतर जिल्ह्यातील खडी क्रशर बंद असल्याबाबत**

**(१०) * ५८६२७ श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यासह इतर जिल्ह्यातील खडी क्रशर बंद ठेवण्याच्या सूचना शासनाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिल्यामुळे घरकुल योजनेसह पंतप्रधान सडक योजना, खाजगी बांधकाम व्यवसायिक, शासनाच्या इतर कार्यालयाची बांधकामे बंद पडली असून सदर कामाशी संबंधित नागरीकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडी क्रशर बंद ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच वाळू बंदीचा निर्णय घेतल्यानंतर उक्त माध्यमातून मिळणारी क्रश सँड व खडी मिळत नसल्याने बांधकाम व्यावसायीकांसोबतच शासनाच्या अनेक योजना बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सुधागड (जि.रायगड) तालुक्यात शेतघरांच्या नावाखाली अनधिकृत बंगले व फार्महाऊसची उभारणी करण्यात येत असल्याबाबत**

**(११) * ५७२१९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात विकासक जमिनी खरेदी करत असून बिनशेतीची परवानगी न घेता शेतघरे बांधण्याच्या नावाने मोठ्या प्रमाणात अनधिकृत बंगले व फार्महाऊस उभारून विक्री करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील महसूल विभागाच्या कार्यालयात माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान ४८० अनधिकृत शेतघरांची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने विकासक शेतघराच्या नावाने अनधिकृतपणे बंगले उभारून नागरिकांची फसवणूक करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाचा करोडो रूपये महसूल बुडविणाऱ्या विकासकावर व याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) ता.सुधागड, जि.रायगड पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये ३ गावांमधील एकूण ५ जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार झाल्याचे आढळून आले आहे.

तसेच ता.सुधागड, जि.रायगड येथे सन २०२१-२२ मध्ये एकूण ३७४ अनधिकृत शेतघरे निदर्शनास आली आहेत व सन २०२२-२३ मध्ये एकूण ५६४ अनधिकृत शेतघरे निदर्शनास आली आहेत. पैकी पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये एकूण ३१३ अनधिकृत शेतघरांचे बांधकामे निदर्शनास आली आहेत.

अनधिकृत शेतघरधारकांकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन वापरामध्ये बदल करणे व बिनशेती आकार) नियमावली, १९६९ मधील तरतुदींच्या अनुषंगाने सन २०२१-२२ मध्ये रूपये ५२,७६,१०६/- एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये एकूण ५६४ पैकी २६६ अनधिकृत शेतघर धारकांकडून रूपये ३३,२१,८५३/- एवढी दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आली आहे. उर्वरित शेतघर धारकांकडून मार्च, २०२३ अखेरपर्यंत दंडात्मक रक्कम वसूल करण्याची तजवीज ठेवली आहे.

तसेच सदर अनधिकृत शेतघर बांधकामधारकांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७(ब) व महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन वापरामध्ये बदल करणे व बिनशेती आकार) नियमावली, १९६९ चे कलम ९ नुसार व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४-४५ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## चितेगाव (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे बनावट दारू कारखाना सुरु केल्याबाबत

**(१२) * ६१८०३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर राज्य महामार्गावर असलेल्या चितेगावलगत (ता.मूल, जि.चंद्रपूर) तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट देशी दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून जवळपास १७ लाख रूपयांचा मावेजा जप्त केला असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जागेवर बनावट देशी दारूचा कारखाना सुरू करण्यात आला असून ती जागा एका माजी सैनिकाला शासनाकडून वाटपात मिळालेली असून त्या जागेवर शेळी प्रशिक्षण केंद्रासाठी बँकेकडून लाखो रूपयांचे कर्ज घेतल्याने ही जागा बँकेकडे गहाण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर कारवाई दिनांक २५.१.२०२३ रोजी करण्यात आली असून त्यामध्ये एकूण रुपये १६.५० लक्ष इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी गु.र.क्र.०४/२०२३, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५, ८१, ८३, १०३ व भा.दं.वि. कलम ३२८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३०८० लिटर स्पिरीट, ब्लेंड ५०० लिटर, बुचे सील करणारी मशीन, रिकाम्या बाटल्या, लेबल, इसेन्स, कागदी बॉक्स इ. साहित्य जप्त केलेले आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ फरार आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेवकी-देवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील गावांमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१३) * ५९५०२ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवकी-देवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील गावांमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावर मयत व्यक्ती, अपंग पुरुष, गरोदर माता व अंगणवाडी सेविका यांना काम केल्याचे दाखवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात अनेक मजुरांचे फिनो बँकेत बनावट खाते उघडून हा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणात अधिकाऱ्यांशी संगनमत असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रकरणात सविस्तर चौकशी करण्यात येत आहे. संबंधित ग्रामसेवक, रोजगार सेवक यांची सुनावणी घेण्यात येवून दोषी आढळून आल्यास संबंधितांविरुध्द नियमांप्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पर्जन्यमापक यंत्रे विहित मापदंडाचे पालन न करता बसविण्यात आल्याबाबत

**(१४) * ५७२९८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काही जिल्ह्यात पर्जन्यमापक यंत्रे बसविण्याचा निर्णय शासनाने घेऊन स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड व राज्य शासन यांच्यात सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारानंतर कंपनीद्वारे राज्यात २ हजार ६५ पर्जन्यमापक यंत्रे बसविण्यात आल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, भारतीय हवामान खात्याच्या नियमानुसार पर्जन्यमापक यंत्र हे उंच इमारत, झाड किंवा पाण्याच्या स्त्रोत्रापासून लांब असणे आवश्यक असताना विहित मापदंडांचे उल्लंघन करुन सदरहू यंत्रे चुकीच्या जागेवर बसविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिवृष्टी, पीक विमा तसेच नुकसान भरपाई इत्यादीसाठी या पर्जन्यमापक यंत्राच्या नोंदी प्रमाण असल्यामुळे यंत्रांच्या चुकीच्या नोंदीमुळे अनेक गावे व तालुके अतिवृष्टीच्या यादीतून वगळण्यात आली असून अनेक शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन यंत्र बसविण्याबाबत विहित मापदंडाचे पालन करण्याबाबत तसेच कृषी विभागातील अधिकाऱ्यांसह कंपनी व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

BOO तत्वावर करार करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सद्यस्थितीत राज्यामध्ये महसूल मंडळ स्तरावर स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रायवेट लि. यांचेमार्फत २१२७ स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापित करण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

WMO (World Meteorological Organization) च्या निकषाप्रमाणे अधिकाधिक योग्य असलेल्या जागेत हवामान केंद्रे बसविलेली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात फळ विक्रेत्यांकडून रासायनिक पदार्थाचा वापर करुन कृत्रिमरीत्या फळे पिकविण्यात येत असल्याबाबत

**(१५) * ६०३५२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी विक्रेत्यांकडून कॅल्शियम कार्बोनेट सारख्या घातक रासायनिक पदार्थाचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रसायनाचा वापर हा विविध रोगांना आमंत्रण देणारा असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या या रासायनिक पदार्थांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन रासायनिक पदार्थाचा वापर करुन कृत्रिमरीत्या फळे पिकविणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

राज्यात फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी विक्रेत्याकडून कॅल्शियम कार्बाईडसारख्या घातक रासायनिक पदार्थांचा वापर करण्यात येत असल्याबाबतची बाब निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

अन्न सुरक्षा मानके (Prohibition & amp; Restrictions on Sale) Regulation-२०११ मधील नियमन २.३.५ नुसार कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी कार्बाईड गॅसचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, ऑगस्ट २०१६ मध्ये सदर नियमनामध्ये केलेल्या दुसऱ्या दुरुस्तीनुसार सदर नियमनाच्या परंतुकात कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी १०० पीपीएम पर्यंत इथिलिन गॅसचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात ई-पीक नोंदणी अभावी शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान

**(१६) * ५६८९७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील मोबाईल नेटवर्कचा अभाव आणि अँड्रॉइड मोबाईल चालवता येत नसलेल्या एक लाख ८० हजार आदिवासी शेतकऱ्यांच्या पिकाची ई-पीक पाहणी करता आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-पीक पाहणी अभावी शेतकऱ्यांच्या शेतातील हजारो क्विंटल भात आदिवासी विकास महामंडळ खरेदी करत नसल्यामुळे या भाताची उंदीर आणि घुशींकडून नासधुस केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचा महसूल विभाग, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास महामंडळ आणि अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये समन्वय नसल्यामुळे परिपत्रक काढून ज्या शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झालेली नाही त्यांची नमुना अर्जात माहिती भरून घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आदिवासी शेतकऱ्यांच्या पिकाची ई-पीक पाहणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) पालघर जिल्ह्यामध्ये एकूण २,१४,३२१ इतकी शेती खाती असून १,०३,२५५ हे.आर खरीप क्षेत्र आहे. त्यापैकी खरीप हंगाम २०२२ मध्ये ५१,४१४ इतक्या खातेदारांनी ७२,६५५.१३ हे.आर क्षेत्रावर ई-पीक पाहणी ॲपद्वारे पीक पेरणीची नोंद केली आहे.

ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी ॲपद्वारे पिकांची नोंदणी केलेली नाही किंवा झालेली नाही अशा

शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे आदिवासी विकास महामंडळ यांचे मार्फत धान खरेदी करण्याकरीता तलाठी स्तरावरुन हस्तलिखित पध्दतीने पिकांची नोंदी करून देण्यात येत आहे.

तसेच, ज्या शेतकऱ्यांची ई-पीक नोंदणी झाली नाही व ७/१२ वर मुदतीअभावी पीक पेऱ्याची नोंद झालेली नाही, अशा शेतकऱ्यांची यादी त्यांचे नाव, सर्व्हे नंबर, गट नंबर. खाते क्रमांक व खरीप पणन हंगाम २०२२-२३ करिता धानाखालील क्षेत्र इ. माहितीसह तहसीलदार यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांच्यामार्फत खरेदी केंद्र चालकांना व NeML यांना उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

तसेच, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक ०९.०१.२०२३ च्या पत्रान्वये पणन हंगाम २०२२-२३ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरीता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरीता दिनांक १५.०१.२०२३ पर्यंत मुदतवाढ देखील देण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तसेच सर्व शेतकऱ्यांना विमा परताव्याची रक्कम देण्याबाबत

**(१७) * ५७२२७ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळ, अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत शेतपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यासाठी सन २०१६ या कालावधीपासून पंतप्रधान पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक जिल्ह्यात सन २०२०-२०२२ या कालावधीत अतिवृष्टी, महापूर, किडींचा प्रादुर्भाव इ. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या खरीप व रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतानाही त्यांना अद्यापपर्यंत पीक विम्याचे पैसे मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपन्यांकडून नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे न करणे, सारख्याच क्षेत्रातील दिलेल्या नुकसान भरपाईत तफावत असणे, अनेक क्षुल्लक कारणास्तव दावे नाकारणे, तांत्रिक कारणास्तव अपात्र घोषित करणे इ. अनेक कारणांमुळे शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांनी विहित मुदतीत पूर्वसूचना दाखल करुनही पीक विमा कंपन्यांकडे हजारो अर्ज नाकारण्यात आले असून अनेक ठिकाणी अर्ज प्रलंबित देखील ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीकडे विम्याचा नियमित हफ्ता भरुनही तसेच पिकाचे नुकसान झाल्यानंतरही अनेक शेतकऱ्यांचे पिक विम्याचे दावे नाकारण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शेतकऱ्यांनी या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने ७ पीक विमा कंपन्यांना नोटीसा बजावलेल्या असून या कंपन्यांनी अद्याप उत्तर देखील दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या सर्व अर्जांची पुन्हा पाहणी करण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी देऊनही त्याकडे विमा कंपन्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देणेबाबत तसेच विमा कंपन्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

खरीप २०२० हंगामात अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस इत्यादी नैसर्गिक आपत्ती मुळे उभ्या पिकाचे तसेच काढणीपश्चात नुकसान या जोखमीच्या बाबी अंतर्गत नुकसान झाले होते. तथापि पिक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकरी हे कोविड-१९ ची लाक्षणिक स्थिती, त्याच बरोबर शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नसणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्या, टोल फ्री क्रमांक न लागणे, पीक विमा ॲप वर सूचना न देता येणे. शासकीय तसेच विमा कंपनीची कार्यालय पूर्ण क्षमतेने चालू नसणे. प्रवास विषयक शासनाच्या निर्बंध अशा विविध कारणांमुळे शेतकरी नुकसान होऊनही विमा कंपन्यांना सूचना देऊ शकले नाहीत. यामुळे नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहिले आहेत. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, स्थानिक नैसर्गिक आपत्ती या जोखमीच्या बाबीं अंतर्गत पात्र शेतकरी नुकसान भरपाई वंचित राहू नये याकरिता महसूल, कृषि व जिल्हा परिषद या विभागामार्फत ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले असून विमा कंपन्यांनी सदरचे पंचनामे ग्राह्य धरुन जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी संबंधित विमा कंपन्यांना राज्य स्तरावरुन निर्देश दिलेले आहेत. प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे राज्यात राबविण्यात येत असल्याने केंद्र शासनाकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

खरीप २०२०, रब्बी २०२०-२१, खरीप २०२१, रब्बी २०२१-२२, खरीप २०२२ अंतर्गत एकूण १४५.०३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना अंतरिम नुकसान भरपाई ७४२२.९९ लाख देय आहे. यापैकी १२२.०६ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ६६१२.८८ लाख नुकसान भरपाई वाटप झालेली आहे. उर्वरित नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
(६) हे खरे नाही.
(७) हे खरे नाही.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील बिबट्यापासून संरक्षण मिळण्यासाठी बिबट निवारा केंद्राचे विस्तारीकरण करण्याबाबत

**(१८) * ५९६४१ श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ओतुर-उदापूर सिमेवर ढमाळे मळा, वाकोबा मंदिर वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कु.पवन रामदास मधे हा ७ वर्षीय मुलगा दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) तसेच ओतुर जवळील अहिनवे वाडी येथील निर्मळा किसन वायाळ (वय १९ वर्षे) ही तरुणी दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सकाळी ६ वाजता पोलीस भरतीच्या पूर्वतयारीकरिता अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाकडे जात असताना बिबट्याने तिच्यावर अचानक हल्ला केला, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे भिवेगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील पश्चिम दुर्गम भागातील लक्ष्मण रामभाऊ वनघरे या वयोवृद्ध शेतकऱ्याचा बिबट्याने हल्ला केल्यामुळे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारे मागील वर्षभरात ओतूर अहिनवे वाडी, डिंगोरे, सारणी, आंबगवाण, चिल्लेवाडी, पाचघर, नेतवड, माळवाडी आदि परिसरातील सुमारे १० हून अधिक नागरिकांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू होऊन २५ हून अधिक ग्रामस्थ जखमी झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी सदरहू भागातील माणिकडोह येथे बिबट निवारा केंद्राच्या विस्तारीकरणासाठी जमीन जलसंपदा विभागाकडून वन विभागास हस्तांतरीत करण्यास मान्यता देऊनही वन विभागाने पैसे न भरल्यामुळे हस्तांतरणाची कार्यवाही अद्याप पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी गावांतील नागरिकांची बिबट्यापासून संरक्षण मिळण्यासाठी वन परिक्षेत्र विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच संरक्षण देणे, पिंजरे उभारणे व अन्य उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना आदेश देऊनही कार्यवाही झाली नसल्याने याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(७) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) जुन्नर तालुक्यातील ओतूर अहिनवे वाडी, डिंगोरे, सारणी, आंबगवाण, चिल्लेवाडी, पाचघर, नेतवड, माळवाडी या परिसरात दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक ३१.०१.२०२३ या कालावधीत ७ व्यक्ती बिबट्याच्या हल्ल्यात किरकोळ जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) माणिकडोह बिबट निवारा केंद्र जुन्नर लगत असलेली पाटबंधारे विभागाची जागा निवारा केंद्राचे उपयोगाकरीता वनविभागास हस्तांरीत करणे प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि, शासनाच्या एका विभागाच्या ताब्यात असलेली जमीन त्या विभागास आवश्यकता नसल्यास प्रथमत: सदर जमीन महसूल विभागास समर्पित करणे आवश्यक आहे. तद्नंतर अन्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येते. त्याअनुषंगाने संबंधितास आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(६) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन कर्मचाऱ्यांचे पथक तयार करुन नियमितपणे संरक्षित क्षेत्र व बिबट प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येते.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून कृत्रिम पाणस्थळे, वनतळी, चेकडॅमची निर्मिती करण्यात येते.
- संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे मार्फत नागरीकांना मानव-वन्यप्राणी-संघर्षच्या परिस्थितीत खबरदारी घेणेबाबत सभेचे आयोजन करुन स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते. तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाद्वारे माहिती देण्यात येते.
- बिबट वन्यप्राणी मानवी वस्तीमध्ये आढळून आल्यास तात्काळ त्यास जेरबंद करुन त्यास नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- वन्यप्राण्यांनी नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना नुकसान भरपाईची रक्कम तात्काळ अदा करण्यात येते.

तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यास आवश्यकतेनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ५७१४३ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वा अपंगत्व आल्यास त्यांना कृषि विभागाकडून स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून आर्थिक मदत केली जाते, हे खरे आहे काय,

(२) यासंदर्भातील अनेक प्रकरणे विमा कंपनीकडे सादर होवूनही त्यातील हजारो प्रकरणे प्रलंबित असून क्षुल्लक तांत्रिक कारणास्तव नामंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेत कुटुंब म्हणून पती, पत्नी, मुलगा, आई-वडील व अविवाहित मुलगी यांचा समावेश असून कुटुंबाच्या व्याख्येत सुनेचा समावेश नसून या व्याख्येत बदल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरील योजना राबविण्यासाठी शासनाने दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी शासन निर्णयाद्वारे चॉईस इन्शुरन्स व युनिव्हर्सल सोम्पो या दोन विमा कंपन्यांची निवड करण्यात आली असूनही योजना राबविण्याचा कालावधी अद्यापही निश्चित करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन सदरहू योजनेंतर्गत प्रलंबित सर्व दावे निकाली काढून शेतकऱ्यांच्या वारसांना विनाविलंब विम्याची रक्कम मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत सन २०१९-२० मध्ये राज्यभरातून एकूण ६१३० विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ४२९५ प्रस्ताव मंजूर झाले असून १४२३ प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. तसेच १९ प्रस्तावांवर कंपनीकडून कार्यवाही सुरु असुन उर्वरीत ३९३ प्रस्ताव कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत.

तसेच सदर योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये एकूण ६६१० विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ३४४९ प्रस्ताव मंजूर झाले असून ११५५ प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. तसेच २०४ प्रस्तावांवर कंपनीकडून कार्यवाही सुरु असुन उर्वरीत १८०२ प्रस्ताव कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत.

(३) होय, हे खरे आहे

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत योजनेचा लाभ देण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायास अनुसरुन कुटुंबाच्या व्याख्येमध्ये कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले १ सदस्यांमध्ये आई-वडील, शेतकऱ्यांची पती / पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही सदस्य यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दिनांक २८.११.२०२२ अन्वये दिनांक ७.०४.२०२२ ते २२.०८.२०२२ या खंडास खंडीत कालावधी म्हणून घोषीत करुन सदर कालावधीतील प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यास विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर खंडीत कालावधीतील विमा प्रस्ताव मागविण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील वन विभागात होत असलेली अवैध वृक्षतोड

**(२०) * ५९३२९ कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील व इतर वन परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर वन परिक्षेत्रात निसर्ग चक्रीवादळात उन्मळून पडलेल्या झाडांचा मागील वर्षापासून लिलाव करतेवेळी लिलावात समाविष्ट नसलेली झाडेही तोडण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी वन अधिकाऱ्यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये वन क्षेत्रात घनमीटर प्रमाणे पैसे देण्याच्या अटीवर ठेकेदारांना जंगलातील झाडे अवैधरीत्या तोडण्याची परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही,

रोहा वन विभागामधील ता.म्हसळा जि.रायगड येथील व इतर वन परिक्षेत्रात माहे जानेवारी, २०२३ मध्ये अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

रोहा वन विभागामधील वनपरिक्षेत्रातील निसर्ग चक्रिवादळात उन्मळून पडलेल्या व शेंडामोड झालेल्या झाडांच्या लिलावात समाविष्ट असलेल्या वृक्षांच्या व्यतिरिक्त इतर झाडांची तोड झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

नियमानुसार जाहिर बोली पध्दतीने लिलाव करुन मक्तेदार यांनी शासकीय लिलाव रक्कम भरुन त्यांना परवानगी दिलेल्या झाडांच्या व्यतिरिक्त कोणत्याही झाडांची अवैधरित्या तोड करण्यात आलेली नाही. त्यामुळे ठेकेदारांना जंगलातील झाडे अवैधरित्या तोडण्याची परवानगी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील नदी घाटावरील वाळूची अवैधरित्या वर्धा व अमरावती जिल्ह्यात तस्करी होत असल्याबाबत

**(२१) * ६१७६१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील भिवापूर हे केंद्रस्थानी असुन पवनी (जि.भंडारा), नागभिड, ता.ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) तसेच गडचिरोली जिल्ह्यातील नदी घाटावरुन निघणारी वाळू भिवापूरमार्गे नागपूर, वर्धा व अमरावती जिल्ह्यात अवैधरित्या नेली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोलीतील तीन ब्रासच्या टिपीवर जवळपास ७ ब्रास रेतीचे वाहन पकडून ते रामनगर पोलीस ठाण्यात दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास नेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेती वाहतूकीच्या परवान्यावर वेळ नमूद केली जात असल्याने आता तस्करांनी गडचिरोलीच्या टिपीवर चंद्रपूर येथील रेती घाटातील वाळू उपसण्याचे काम सुरु केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रेती घाटाचा लिलाव झालेला नसताना चारगड व वर्धा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भिवापूर मार्गावरील बेटाळा येथे वाळू तस्करांनी हल्ला करुन उपविभागीय महसूल अधिकारी व पोलीस उपनिरिक्षकाला मारहाण केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) भिवापूर हे नागपूर-गडचिरोली राष्ट्रीय महामार्ग स्थित असून अवैध गौणखनिजाच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता महामार्गावर भिवापूर जवळ तसेच उमरेड-नागपूर मार्गावर पाचगाव जवळ तपासणी चौकी उभारण्यात आल्या आहेत. माहे जानेवारी, २०२३ मध्ये सदर चौकीवर गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या आढळून आलेल्या एकूण २१ वाहनावर दंडात्मक कारवाई करुन रुपये ५३,९४,०८८/- एवढी रक्कम शासन जमा केलेली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) मौजा बेटाळा येथे वाळू तस्करानी उपविभागीय आधिकारी, भंडारा यांचेवर व त्यांचे पथकावर प्राणघातक हल्ला केला. पोलिस स्टेशन, पवणी येथे संबंधीताविरूध्द गु.र.क्र.११४/२०२२ भा.द.वि.कलम ३५३, ३३२, ३७९, ५०६, ४२७, १०९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासातील गुन्हातील संबंधित आरोपीवर दोषारोपपत्र क्र.८३/२०२२ मा.न्यायालयात सादर केले. प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**राज्यात शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळण्याबाबत**

**(२२) * ५६९२७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे जाहिर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे अप्पर मुख्य सचिव (सहकार विभाग) यांनी या आर्थिक वर्षात सर्व पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाची रक्कम मिळाल्याचे जाहिर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दोन टप्प्यात अनुदानाचे वाटप केलेले असले तरीही राज्यातील हजारो शेतकरी अद्यापही त्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, काही ठिकाणी जिल्हा बँकेने शासनाच्या पोर्टलवर पात्र शेतकऱ्यांच्या भरलेल्या माहितीची पडताळणी केली असता राज्यात ७ लाख ७७ हजार कर्जदारांची माहिती चुकीची भरलेली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पात्र शेतकऱ्यांसंबंधीच्या माहितीमध्ये नांव, खाते क्रमांक इ. स्वरुपाच्या चुका आढळल्या असून नवेगावमाल (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील सेवा सहकारी संस्थेने कर्ज न घेतलेल्यांची नावे यादीत समाविष्ट करुन प्रोत्साहन अनुदान देण्याचे प्रकारही निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणांची चौकशी करुन पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान तातडीने देण्याबाबत तसेच याप्रकरणी झालेल्या गैरप्रकारांबाबत संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.
(२) नाही.
महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय.
(४) अंशत: खरे आहे.
(५) होय.
(६) जिल्हा उपनिबंधक गडचिरोली व सहायक निबंधक, ता.चार्मोशी यांनी याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत सेवा सहकारी संस्था, मर्या. नवेगांवमाल, र.नं.१३११ यांना निर्देश दिले होते. त्यानुसार सदर संस्थेने दोषी असलेल्या संस्था-सचिवास पदावरून कमी करण्याचा ठराव पारीत केला आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सारुळ (ता.जि.नाशिक) येथील खाणपट्टयात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर उत्खनन होत असल्याबाबत

**(२३) * ५७८७७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सारुळ (ता.जि.नाशिक) येथे मंजूर खाणपट्टयातून मर्यादेबाहेर व बेकायदेशीररित्या खनिजाचे उत्खनन होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सारुळ येथील गट नं.१२४ व १२५ मध्ये जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या ७ एकरावरील उत्खनन मंजूरी व्यतिरिक्त प्रत्यक्षात ४७ एकरांवर बेकायदेशीररित्या उत्खनन होत असल्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाणपट्टयाच्या अधिकच्या उत्खननानंतर भूमीअभिलेख विभागाकडून मोजणी करुन सीमांकन देखील करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी वेलगाव येथील रहिवाशी श्री.गुळवे व अन्य तक्रारदारांनी अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे तक्रारी केल्यावर अप्पर जिल्हाधिकारी यांनी गजानन क्रशर यांची खाणपट्टा परवानगी दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये रद्द केली असतांनाही अद्यापही त्या ठिकाणी बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करणेबाबत श्री.गुळवे व स्थानिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व अप्पर मुख्य सचिव, महसूल यांना निवेदन सादर करुन आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) संबंधित खाणपट्टाधारक यांना मौजे सारुळ ता.जि.नाशिक येथिल त्यांच्या खाजगी जमीन गट नं. १२४, १२५ मध्ये एकूण ०४.०० हे.आर मध्ये ५ वर्षाकरीता खाणपट्टा मंजूर करण्यात आला. सदर खाणपट्टयाची ई.टि.एस. व्दारे मोजणी केली असता खाणपट्टाधारक यांनी ०५.७१ हे. आर एवढ्या क्षेत्रामध्ये म्हणजेच ०१.७१ हे. आर एवढे अतिरिक्त उत्खनन केल्याचे आढळून आल्याने सदर खाणपट्टा पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आलेला आहे. तसेच सदर खाणपट्टयाची भुमी अभिलेख विभागाकडून मोजणी करण्यात आलेली असून सिमांकन करावयाचे बाकी आहे. सद्य:स्थितीत सदर खाणपट्टा बंद आहे.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२४) * ५८४७५ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील आव्हाणे परिसरातील गिरणा नदीपात्रात बेकायदेशीररित्या वाळू उपसा सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यानच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील आव्हाणे, खेडी, बांभोरी, सावखेडा व दापोरा या भागातून बेकायदेशीररित्या अमर्याद वाळू उपसा केल्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरील बेकायदा वाळू उपसा रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) जळगाव तालुक्यातील आव्हाणे व खेडी येथील गिरणा नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा करतांना माहे जानेवारी, २०२३ वा त्या दरम्यानच्या कालावधीत तहसिल कार्यालयाच्या पथकामार्फत ०८ वाहने पकडून त्यापैकी ३ वाहनांवर गुन्हे दाखल करुन दंड वसुलीची कारवाई सुरु आहे.

माहे एप्रिल, २०२२ ते ३१ जानेवारी, २०२३ पर्यंत जळगाव तालुक्यात एकूण ७२ वाहनांवर कारवाई करण्यात येवून त्यापैकी ३२ वाहनांवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच, धरणगाव तालुक्यात एकूण २० वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन त्यापैकी १० वाहनांकडून दंड वसूल केला आहे. उर्वरित १० वाहने जप्त करुन दंड वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गाव पातळीवर ग्राम दक्षता पथक, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दक्षता पथकाची तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. जळगांव व धरणगाव तालुक्यातील गिरणा नदीपात्रालगत असलेल्या गावामध्ये नदीपात्रातून गावाकडे येणारे रस्ते जे.सी.बी.च्या साहाय्याने चर खोदून बंद करण्यात आलेले आहेत.जळगांव तालुक्यातील मोगे सायखेडा, मोने निमखेडी, मोगे खेडी, आर्यन पार्क वाघनगर मोजे आव्हाणे व जळगांव शहरातील गणेश कॉलनीजवळील महामार्गावरील चौकात २४ तास महसूल व पोलीस कर्मचारी यांचे संयुक्त पथक स्थापन करण्यात आलेले आहे.

जळगाव जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२२ ते ३१ जानेवारी, २०२३ दरम्यान एकूण ४९० अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ६९२.६८ लाख इतक्या दंडाची आकरणी करण्यात येवून ६६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या महसूल विभागाच्या अखत्यारितील भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेच्या निकालात चुका आढळून आल्याबाबत

**(२५) * ६०५७७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागाच्या अखत्यारितील भूमी अभिलेख विभागाकडून भूकरमापक तथा लिपीक – टंकलेखक पदासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेच्या निकालात चुका असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निकालातील चुकांसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) महसूल विभागाच्या अखत्यारितील भूमि अभिलेख विभागाकडून भूकरमापक तथा लिपीक-टंकलेखक पदासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेचा गुणानुक्रमे निकाल दिनांक २१.०१.२०२३ रोजी घोषित झाल्यानंतर निकालात जातीचा प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाच्या तपशीलामध्ये तफावत असल्याबाबतच्या त्रुटी उमेदवारांनी कळविल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त गुणांबाबत कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही.

त्याअनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना भरलेली माहिती व IBPS कंपनीकडून प्राप्त निकालाची तुलना केली असता, उमेदवारांनी मुळ अर्जात नमुद केलेले जातीचे प्रवर्ग व इतर तपशीलामध्ये, कोणताही बदल न करता सदर माहितीच निकालामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

पदभरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांची अंतिम निवड ही त्यांचे कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गंगापूर, म्हसरुळ, चेहेडी बु. व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे वन विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय शेकडो एकर राखीव वन जमिनीवर उत्खनन होत असल्याबाबत

**(२६) * ५७१६९ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर, म्हसरुळ व चेहेडी बु. (जि.नाशिक) या गावांमधील सर्व्हे नंबर ३३, ५९, २५७, २५९, १५० व १५१ यामधील व्यवस्थापनासाठी वेळोवेळी महसुलाच्या ताब्यात असलेली वन जमिनींच्या सातबाऱ्यावरील "राखीव वने" अशी नोंदच गहाळ झाली असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणातील मूळ मालक असलेल्या वन विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय शेकडो एकर "राखीव वने" जमिनींची विल्हेवाट लावण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील ब्रम्हगिरी पर्वतावर वन विभागाच्या ताब्यातील जमिनींवर उत्खनन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे गंगापूर ता.जि.नाशिक येथील सर्व्हे नं. ३३, ५९ या खाजगी मिळकती असून सर्व्हे नं. १५०,१५१ या मिळकती ग्रुप ग्रामपंचायत यांचे नावे असल्याचे दिसून येते.

मौजे म्हसरूळ ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नं. ३३ वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभागास वितरीत करण्यात आला आहे. सर्व्हे नं. ५९,१५०,१५१ या मिळकती खाजगी मालकीच्या आहेत. सर्व्हे नं. २५७ हा शासनाच्या मालकीचा असून यापैकी काही क्षेत्र वैद्यकिय महाविद्यालयास देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सर्व्हे नं. २५९ हा शासनाच्या मालकीचा असून सदर मिळकतीवर झोपडपट्टी आहे.

मौजे चेहेडी बु. ता.जि.नाशिक येथील स.नं.३३,५९,१५०,१५१ या मिळकतींचे अभिलेख तपासले असता सदर मिळकती या राखीव वने असल्याचे दिसून येत नाही.

सदर मिळकती राखीव वने नसल्याने नोंदी गहाळ होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी वन विभागाच्या ताब्यातील जमीनींवर उत्खनन केले जात असल्याबाबत अहवाल मागविला असता, त्याबाबत वनपरिक्षेत्र त्र्यंबक (प्रा) वनक्षेत्रातील मौजे त्र्यंबक मधील ब्रम्हगिरी पर्वत येत असून सदर क्षेत्र हे राखीव वन असून त्या क्षेत्रामध्ये उत्खनन केल्याचे आढळून आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यामध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात नागरिक व जनावरांच्या झालेल्या मृत्यूंबाबत

**(२७) * ५६६९० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र विशेषत: चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, कोल्हापूर, पुणे, कोकण येथे वाघ, बिबटे, रानडुक्कर तसेच इतर वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात अनेक नागरिकांचे मृत्यू झाले असून काहींना अपंगत्व आल्याच्या घटना घडल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जवळजवळ २१ हजार जनावरांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा हल्ल्यात मृत व जखमी नागरिकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत, नोकरी तसेच शेत पिके व पशुधन हानी यासाठी नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून देण्यात येणारी भरपाई अत्यल्प असून त्यात वाढ करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर हल्ले रोखण्यासाठी वन परिक्षेत्रालगतच्या गावांतील शेतकऱ्यांना शेती कुंपणासाठी तसेच सौर ऊर्जेवर चालणारे करंट यंत्रासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर हल्ले रोखण्यासाठी निश्चित आराखडा तयार केला आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) राज्यात वाघ, बिबट, रानडुक्कर व इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सन २०२२-२३ (जानेवारी, २०२३ पर्यंत) मनुष्य हानीच्या १०० घटना व मनुष्य जखमी होण्याच्या ६४८ घटना निदर्शनास आल्या आहेत. तसेच राज्यात १०७०८ पशुधनांची हानी व ५७६ पशुधन जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास, जखमी व्यक्तीस, पशुधन नुकसानी प्रकरणी संबंधित मालकास, शेतपिक नुकसान प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्काळ अर्थसहाय्य अदा करण्यात येते. तसेच सदर अर्थसहाय्य तात्काळ अदा करण्याकरीता क्षेत्रिय स्तरावर उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जेणे करुन अनुदान उपलब्धतेची वाट न पहाता अर्थसहाय्य अदा करणे शक्य आहे.
(४) महाराष्ट्र राज्यामध्ये वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीप्रकरणी अदा करण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याच्या रक्कमेबाबत प्रचलित शासन निर्णयातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

मानवी जिवीतास हानी :- मृत्यु प्रकरणी रुपये २०.०० लाख, कायमचे अंपगत्व रु. ५.०० लाख, गंभीर जखमी रुपये १.२५ लाख, किरकोळ जखमी रुपये ०.२० लाख पर्यत उपचार खर्च. (दिनांक २३.०८.२०२२ पासुन लागु)
पशुधन हानी :- i) गाय, म्हैस, बैलांचा मृत्यु झाल्यास बाजार भाव किंवा किंमतीच्या ७५% किंवा रुपये ७०,०००/- या पैकी कमी असणारी रक्कम.
ii) मेंढी, बकरी व इतर पशुधनाचा मृत्यु झाल्यास बाजार भाव किंमतीच्या ७५% किंवा रुपये १५,०००/- या पैकी कमी असणारी रक्कम.
iii) गाय, म्हैस, बैल या जनावरांना कायम अपंगत्व आल्यास बाजार भाव किंमतीच्या ५०% किंवा रुपये १५,०००/- या पैकी कमी असणारी रक्कम.
iv) गाय, म्हैस, बैल, मेंढी, बकरी व इतर पशुधन जखमी झाल्यास औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात येतो. औषधोपचार शासकीय / जिल्हापरिषद पशुचिकित्सालयात करण्यात यावा. देय रक्कम मर्यादा बाजार भाव किंमतीच्या २५% किंवा रुपये ५,०००/- प्रती जनावर यापैकी कमी असणारी रक्कम (दिनांक २३.०८.२०२२ पासून लागू)

शेत पिक नुकसानी :- किमान रुपये १,०००/- पासून कमाल रुपये २५,०००/- पर्यत

फळबाग नुकसानी:- नारळ रुपये ४८००/- प्रतीझाड, सुपारी झाड रुपये २८००/- प्रती झाड, कलमी-आंबा रुपये ३६०० प्रती झाड, केळी रुपये १२०/- प्रती झाड, संत्रा / मोसंबी रुपये २४००/- प्रती झाड व इतर फळझाडे रुपये ५००/- प्रती झाड

(५) वन्यप्राण्यांकडून होणारे शेतपिकांची नुकसान रोखण्यासाठी सौर ऊर्जेवर चालणारे व्यक्तीगत सौर उर्जा कुंपण देण्याच्या योजनेस दिनांक २५.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने लाभार्थाची निवड प्रक्रिया सुरु असून त्याकरीता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रुपये ५०.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

(६) मनुष्य हानी व पशुधन हानीच्या घटनांपैकी बहुतांश घटना ह्या वनात घडतात. त्यामुळे मानवाचे वनावरचे अवलंब कमी करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- अभयारण्यालगतच्या २ कि.मी. परीसरातील गावे / व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रातील गावे, व्याघ्र भ्रमण मार्गातील गावांची डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनांतर्गत निवड करुन आतापर्यत १२८७ गावांमध्ये वनावरील अवलंब कमी करणे, पर्यायी रोजगार निर्माण करणे, इत्यादी कामे घेण्यात आली आहेत.
- संवेदनशिल क्षेत्रात प्राथमिक बचाव गटाची निर्मिती करण्यात आली आहे.
- वन्यप्राणी व त्यांच्या हालचालीबाबत सनियंत्रण करुन गावामध्ये त्याबाबात जनजागृती करण्यात येते.
- मानवी जिवितास हानी पोहचविणाऱ्या वन्यप्राण्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीचा अवलंब करुन जेर बंद करण्यात येते.

(७) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात दूध विक्रीकरिता आरेचे बेकायदेशीर स्टॉल्स उभारण्यात आल्याबाबत

**(२८) * ५६७०७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनातर्फे मुंबईतील आरेच्या सुमारे १८०० स्टॉल्सना फुटपाथवर दर महिन्याला १५० रुपये दर आकारुन दूध वितरणासाठी परवानगी देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत मुंबईत जवळजवळ ४ हजार स्टॉल्स सुरु असून २२०० स्टॉल्स महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरेचे कोणतेही उत्पादन सद्यःस्थितीत बाजारामध्ये उपलब्ध नसतानाही या स्टॉल्सवर गुटखा, वेफर्स, अल्पोपहाराचे पदार्थ व इतर वस्तू विक्रीसाठी मिळत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अधिकृत स्टॉल्सवर आरेची उत्पादने उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अनधिकृत स्टॉल्स व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मुंबई शहर व उपनगरात दुग्धविकास विभागाची एकूण १८११ आरे केंद्र असून, त्यापैकी १६९५ केंद्र कार्यरत आहेत.
(३) (४) व (५) सदर आरे केंद्रांना आरे ब्रँडशिवाय इतर संस्थांचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी देण्यात आली आहे. आरे स्टॉल तपासणीसाठी पथके तयार करण्यात आली असून तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व, जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्तू एफ हाऊसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अनधिकृतरित्या बांधकाम होत असल्याबाबत**

**(२९) * ६०६१७ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील लोढा हेरिटेज (डोंबिवली पूर्व, जि.ठाणे) चंद्रेश वास्तू एफ हाऊसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अनधिकृतरित्या बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सोसायटीत अवैधपणे निवडणूक घेऊन शासनाच्या नियमाला डावलणाऱ्या संबंधित पदाधिकाऱ्यांविरोधात सोसायटीच्या काही सदस्यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व १० जानेवारी, २०२३ रोजी व त्यासुमारास मा.सहकार व मा.पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने अद्यापही कोणती कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डोंबिवली परिसरातील बहुतांशी हाऊसिंग सोसायटीमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून पाठिंबा मिळत असल्याने असे प्रकार वाढल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच चंद्रेश को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील अनधिकृत बांधकामावर व सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यासंदर्भात व संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) काही अंशी विनापरवानगी बांधकामाच्या अनुषंगाने ही बाब अंशत: खरी आहे.
(२) होय. दिनांक २१.१२.२०२२ रोजीचे निवेदन सहकार विभागास प्राप्त झाले आहे.
(३) हे खरे नाही.
उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांच्या कार्यालयाने दिनांक १५.२.२०२३ रोजी आदेश पारित करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ) (३) पोटकलम (२) अन्वये चंद्रेश वास्तू एफ को-ऑप.हौ.सोसा. लि., लोढा हेरिटेज, देसलेपाडा, डोंबिवली (पूर्व), ता.कल्याण, जि.ठाणे या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.
(४) डोंबिवली परिसरातील गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील अनधिकृत बांधकाम हा विषय सहकार विभागाच्या अखत्यारीतील नसून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा आहे. यासंदर्भात नगर विकास विभागाने सदर बाब खरी नसल्याचे कळविले आहे.

(५) याबाबत नगर विकास विभागाकडून या विभागास कळविल्यानुसार, लोढा हेरिटेज अंतर्गत चंद्रेश को-ऑप.हौसिंग सोसायटी एफ विंग मध्ये दिनांक २१/०२/२०२३ रोजी महानगरपालिकेने पाहणी केली असता सोसायटीच्या गच्चीवरील शेड, दुकानांवरील शेड, टॉयलेट व सोसायटी कार्यालय ही बांधकामे महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगीशिवाय केलेली आढळून आली आहेत. सदर बांधकामे पूर्वीपासूनची असून नव्याने झालेली नाहीत. मात्र सदर अनधिकृत बांधकामे कायदेशीर प्रक्रिया (DPL) पार पाडून निष्कासनाची कारवाई करणेत येईल, असे कल्याण डोबिंवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील गड किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत**

**(३०) * ५६५३३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ४०० गड किल्ले असून त्यापैकी ४८ किल्ले हे राज्य पुरातत्व खात्याच्या संरक्षणात तर ४७ किल्ले केंद्र पुरातत्व खात्याच्या संरक्षणात आहेत व उर्वरित तब्बल ३०० हून अधिक किल्ले हे आजही असंरक्षित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक किल्ल्यांची मोठ्या प्रमाणात पडझड होत असून विशेषत: सिंहगड (जि.पुणे), मंगळवेढा भुईकोट किल्ला (जि.सोलापूर), किल्ले अवचितगड (जि.रायगड), सायन किल्ला (मुंबई) यासह सर्वच गड किल्ल्यांचे संवर्धन करण्याची मागणी गडप्रेमी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील गड किल्ल्यांच्या विकासासंदर्भात माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयात झालेल्या बैठकीनुसार घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, इतिहासप्रेमी, गडप्रेमी व सामाजिक संघटनांनी मा.पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व गड किल्ल्यांसंदर्भात विकास आराखडा तयार करुन त्याची दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण तसेच त्यासाठी आवश्यक निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील दुर्ग संवर्धनासाठी दुर्ग प्राधिकरणाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील ५९ किल्ले राज्य संरक्षित स्मारके व ४७ किल्ले केंद्र संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सिंहगड (जि.पुणे) व मंगळवेढा भुईकोट किल्ला (जि.सोलापूर) या किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबतचे मागणीपत्र पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयास प्राप्त झाले आहे. अवचितगड किल्ला (जि.रायगड) व सायन किल्ला (जि. मुंबई शहर) केंद्र संरक्षित स्मारके असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्या अखत्यारीत आहेत. यापैकी सायन किल्ल्याचा बुरुज अतिवृष्टीमुळे ढासळला असून त्याचे दुरुस्तीचे काम निविदा स्तरावर सुरु आहे.

(३) अशा आशयाची कोणतीही बैठक माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये झालेली नसून शासनाने मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या गडसंवर्धन समितीची पहिली बैठक दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली होती. या बैठकीत समिती सदस्यांनी राज्यातील गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाबाबत विचार मांडले आहेत.

(४) राज्यातील राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन दुरुस्तीसाठी प्रतिवर्षी राज्यस्तरावर आवश्यक ती तरतूद करण्यात येते. तसेच दिनांक १४.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये या कामांसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत आर्थिक वर्ष २०२३-२४ पासून पुढील ३ वर्षासाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) दुर्ग प्राधिकरण स्थापन करण्याचे प्रस्तावित नाही. तथापि, राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, संवर्धन यासाठी शासकीय निधीसह खाजगी स्त्रोतातील निधी वापरता यावा व स्थानिक पातळीवर या कामांमधील जनतेचा सहभाग वाढावा या उद्देशाने तसेच जिल्हास्तरावर जतन व संवर्धन कामांचे सुनियोजित व्यवस्थापन होण्याकरीता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महावारसा सोसायटी स्थापन करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३१) * ५६५४५ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानासाठी सन २०२२-२३ या वर्षाकरिता १९ जिल्ह्यांसाठी रुपये ४१.४३ कोटी इतका निधी वितरित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महसूलनिहाय व जिल्हानिहाय विभागास प्राप्त झालेल्या निधीपैंकी केवळ रुपये १६.१९ कोटीच खर्च होवून उर्वरित रुपये २५.७३ कोटी इतका निधी अखर्चित राहिल्याने समर्पित (Surrender) करावा लागल्याचे माहिती अधिकारी, फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीअन्वये दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि विकासासाठी शासन हा निधी देत असताना तो अखर्चित राहून परत पाठविण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त निधी पुनरुज्जिवीत करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन निधी परत मिळविण्याबाबत तसेच निधी खर्च न करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

सन, २०२२-२३ मध्ये राज्यासाठी रुपये १९९.३४ कोटी रक्कमेच्या कार्यक्रमास मंजूरी मिळाली असून राज्यातील ३४ जिल्ह्यासाठी रुपये १०७.९२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली शहरातील कोट्यवधी रुपयांच्या वनजमिनींची विक्री करुन केलेला गैरव्यवहार**

**(३२) * ५६८६९ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली शहराच्या मध्यवर्ती भागात कोट्यवधी रुपयांच्या वनजमिनीतील भूखंडांची अधिकाऱ्यांच्या संगनमताने विक्री करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारभावाप्रमाणे सदर जागेची किंमत ७ ते ८ कोटी रुपये असताना अत्यंत कमी दराने या जमिनींची विक्री करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागाच्या निरीक्षकांनी ही जमीन वन विभागाची असल्याचा अहवाल दिल्यानंतर चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी वनसंरक्षकांनी आठ दिवसात कारवाई करण्याबाबत आश्वासन देऊनही चौकशी अधिकाऱ्यांनी आठ महिने कार्यवाही प्रलंबित ठेवली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणातील कारवाईस झालेल्या विलंबामुळे या प्रकरणातील आरोपी व दोषी अधिकारी फरार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

गडचिरोली शहरालगत वन विभागाचे वन कक्ष क्रमांक १७० मधील सर्व्हे क्र. २१ व सर्व्हे क्रमांक १०० मधील एकूण क्षेत्र १.२९ हे. जमिनीवर अतिक्रमण करुन भूखंड लेआऊट आखणीकरीता सिमेंटचे पिल्लर रोवून प्लॉट टाकण्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणाची चौकशी सुरु असून वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताची बाब अद्याप निदर्शनास आलेली नाही.

तथापि, भूखंडाची अवैधरित्या विक्री झाली आहे किंवा कसे याबाबत माहिती घेण्याकरिता वन विभागाशी संपर्क करण्याचे आवाहन उप वनसंरक्षक, गडचिरोली यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून केले होते. मात्र अद्याप कोणीही वन विभागाशी संपर्क साधलेला नाही.

(३), (४), (५) व (६) प्रस्तूत क्षेत्र वन जमिन असल्याची खात्री झाल्यामुळे अतिक्रमणास जबाबदार असलेल्या चार आरोपींविरुद्ध वन गुन्हा क्र. ०७६३०/१७०७४५, दिनांक १३.५.२०२२ नोंदविण्यात आला असून चौकशीत अन्य दोन आरोपी देखील सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर सहा आरोपींच्या विरुद्ध मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांच्या न्यायालयात दिनांक २७.१.२०२३ रोजी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. त्यामुळे प्रकरणातील आरोपी व दोषी अधिकारी फरार झाले हे खरे नाही.

प्रस्तूत प्रकरणात वन परिक्षेत्र अधिकारी श्री.अरविंद पेंदाम यांना दिनांक २०.२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच वन गुन्ह्यातील आरोपींच्या भ्रमणध्वनीचे CDR मागविण्यात आले असून प्रस्तूत प्रकरणी सविस्तर चौकशी सुरु आहे.

प्रस्तूत क्षेत्र अतिक्रमण मुक्त करुन क्षेत्राभोवती खोल चर खोदून बंदिस्त करण्यात येऊन सदर क्षेत्र वन विभागाने ताब्यात घेतले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा, सोलापूर व अमरावती जिल्ह्यातील "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत" घरकुलांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(३३) * ६०४१० श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून भटक्या-विमुक्त समाजातील लोकांना शासनाकडून घरकुल मिळण्याकरीता अनेक पात्र लाभार्थ्यांनी अर्ज केला असून सुमारे १५ हजार लोकांनी अर्ज करुनही त्यांना घरकुल मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यात या योजनेकरीता रुपये ३६ कोटी रुपयांची आवश्यकता असून या प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अर्जांना प्रशासकीय मान्यता देवूनही अद्यापही शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर जिल्ह्यातील "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेंतर्गत" जाहिर करण्यात आलेल्या २८६७ घरांचा प्रस्ताव शासनाकडे सन २०२०-२१ या कालावधीत सादर करण्यात आला तथापि, साताऱ्यासह इतर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना घरकुले देण्यात आली असताना केवळ सोलापूर जिल्ह्यातील एकाही लाभार्थ्यांस अद्यापपर्यंत उक्त योजनेंतर्गत शासनाने मंजूरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच अमरावती जिल्ह्यात देखील बहुतांश घरकुलांची प्रकरणे प्रलंबित असून त्यासाठी आवश्यक असणारा निधी देखील देण्यात आला नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भंडारा, सोलापूर व अमरावती जिल्ह्यातील घरकुलांची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढून त्यासाठी आवश्यक निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत भंडारा जिल्हास्तरीय समितीकडे सन २०२१-२२ व २०२२-२३

मध्ये प्राप्त ७५०० वैयक्तिक लाभार्थ्यांच्या अर्जांपैकी २९७३ पात्र लाभार्थ्यांना समितीने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सन २०२१-२२ मध्ये ४५६ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास शासनस्तरावरून कार्योत्तर मान्यता देवून सदरहू कामांसाठी उपलब्धतेनुसार रुपये २०.०० लक्ष इतका निधी देण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सन २०२२-२३ करीता योजनेंतर्गत ७३६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पीत तरतुदीमध्ये कपात करण्यात आल्याने सदरहू प्रस्तावांस कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करता आली नाही.

(४) हे खरे नाही.

सन २०२१-२२ करीता अमरावती जिल्ह्यातील ६१७ वैयक्तिक घरकुल व ५ वसाहतींसाठी कार्योत्तर मान्यता देण्यात आली असून त्याकरीता रुपये ८७५.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात तूर पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३४) * ५७२६१ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व संततधार पावसामुळे तसेच सततच्या बदलत्या वातावरणामुळे ७० हजार हेक्टर क्षेत्रातील ६२ टक्के तूर पीक बाधित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील बहुतांश भागात तुरीच्या उत्पादनाची सरासरी घसरली असून अनेक भागात तूर जळाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी तथा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कृषी विभागाने पाहणी करुन नुकसानीचे पंचनामे जिल्हा प्रशासनास सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्तांना प्रती हेक्टर १३,६०० रुपये नुकसान भरपाई देण्याची घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

अमरावती जिल्ह्याची तूर पिकाची ५ वर्षाची सरासरी उत्पादकता ९८५.७४ क्विंटल प्रति हे. आहे. सन २०२२-२३ मध्ये जिल्ह्यात तूर पिकाचे एकूण ४४४ पिक कापणी प्रयोगाचे नियोजन असून, प्राप्त २९९ पिक कापणीच्या प्रयोगावरुन जिल्हयाची ३४९.५१ क्विंटल प्रति हे. उत्पादकता दिसून आलेली आहे.

खरीप हंगामातील जिरायती पिकाखालील ४२१३९२ हे., बागायती पिकाखालील १५९० हे. व फळपिकाखालील ७३१९४ हे. असे एकूण ४९६१७६ हे. बाधित क्षेत्राचे पंचनामे करुन संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ अन्वये मदतीच्या प्रचलित दरापेक्षा दुप्पट दराने म्हणजेच हेक्टरी रूपये १३,६००/- दराने मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(४) अमरावती जिल्ह्यातील शेती/ फळपिकाखालील एकूण बाधित क्षेत्राकरिता महसूल व वन विभागाकडून आत्तापर्यंत रक्कम रुपये ५६२.६७ कोटी इतका निधी विशेष दराने उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील त्रुटी दूर करुन शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(३५) * ५६८४२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना पेन्शन देण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री किसान सन्मान योजना सुरु केली असून सदर योजनेचे काम गेल्या तीन महिन्यापासून बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या बँक खात्याशी आधार लिंक करण्यासाठी १५ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदत देण्यात आली होती, परंतु अद्यापही १४.८७ लाख शेतकऱ्यांचे आधार लिंक न झाल्याने शेतकरी योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेच्या अंमलबजावणीत महसूल व कृषी विभाग यांच्या समन्वयाचा अभाव आणि श्रेय वादामुळे जवळजवळ ३७ लाख शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापही लाखो शेतकऱ्यांच्या ई-केवायसी अपूर्ण राहिल्यामुळे व त्यासाठी नव्याने अर्ज करुनही डाटा दुरुस्ती करुन तो डाटा कृषी विभागाकडे हस्तांतरीत न झाल्यामुळे अनेक महिन्यांपासून दुरुस्तीच्या नावाखाली पोर्टल बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अनेक शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत काही हप्ते मिळाल्यानंतर तांत्रिक व क्षुल्लक कारणास्तव पुढील हप्ते बंद झाल्याचेही निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे, खरे नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पी. एम. किसान योजनेतील पात्र लाभार्थी यांची बँक खाती आधारशी जोडणे ही बाब बंधनकारक करुन सदर कार्यवाही दिनांक १५ डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याबाबत केंद्र शासनाने सूचित केले होते. त्यानुसार प्रलंबित १३.३२ लाख लाभार्थ्यांचे बँक खात्याशी आधार लिंक करणेची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

पी.एम.किसान योजनेच्या कामकाजाबाबत मा. मंत्री महसूल व मा. मंत्री कृषि यांच्या दिनांक २३.०८.२०२२ रोजीच्या तलाठी व कृषि सहाय्यक संघटनेच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीमध्ये कामकाज पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सद्यस्थितीत भूमी अभिलेख नोंदीप्रमाणे माहिती प्रलंबित असलेले एकूण ४.३५ लाख पात्र लाभार्थींची माहीती महसूल विभागाकडून अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच एकूण ४.१० लाख लाभार्थींची डाटा दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

(४) हे, खरे नाही.

(५) अंशत: खरे आहे.

या योजनेअंतर्गत काही हप्ते मिळाल्यानंतर तांत्रिक कारणास्तव पुढील हप्ते बंद झाल्याचे कारण तपासून लाभार्थी / जिल्हा नोडल अधिकारी/ एन. आय. सी. दिल्ली यांच्यापैकी ज्यांच्याशी संबंधित आहे त्यांना दुरुस्ती करण्याबाबत कळवून अशा लाभार्थींचा लाभ पूर्ववत केला जातो.

(६) व (७) क्षेत्रीयस्तरावर महसूल विभागाच्या काही संघटनांनी योजनेचे कामकाज करण्यावर बहिष्कार घातल्याने दुरुस्ती व इतर बाबींची पुर्तता प्रलंबित असलेल्या लाभार्थींना योजनेचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे. सदर योजनेचे कामकाज सुरळीतपणे होण्यासाठी मा.मंत्री (महसूल) व मा.मंत्री (कृषी) यांचे उपस्थितीत दिनांक २३.०८.२०२२ रोजी बैठक आयोजित करुन कामकाज पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे समवेत VC व्दारे झालेल्या दिनांक २७.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकारी यांनी महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तसेच, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रकल्प आढावा समितीच्या दिनांक २३.०१.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये PM-KISAN योजनेअंतर्गत प्रलंबित असलेल्या बाबींची तात्काळ पुर्तता करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.